

# मुलांच्या शैक्षणिक खर्चाचा आराखडा कसा कराल ?

Mob. 9850082849

श्री. अनिल पाटील, असो. फायनान्सियल प्लॅनर

प्रत्येक आई-वडिलांना आपला मुलगा/मुलगी चांगले शिक्षण घेऊन करिअर घडवावे व जीवनात यशस्वी व्हावं असं मनापासून वाटत असतं. हे त्यांच्या जीवनातील महत्त्वाचे ध्येय असते. त्यासाठी प्रत्येक आई-वडिलांची धडपड सुरु असते. आपली जबाबदारी परिपूर्णपणे पार पाडण्यात ते कोणतीही कसर बाकी ठेवत नाहीत. आजच्या स्पर्धात्मक काळात मुलांचे शिक्षण हे फार महत्त्वाचे आहे. त्यासाठी परिपूर्ण नियोजनाची गरज भासते. बरेच पालक मुलांचे पालन पोषण करताना शिक्षण क्षेत्रातील महागाईचा विचार केला जात नाही. मुलांचे लहानपणापासून पालन पोषण, मनोरंजन व करमणूक साधन यासारख्या तात्पुरत्या गरजांसाठी आपले पालक भरमसाठ पैसे खर्च करतात. कालांतराने या मुलांच्या गरजा अन् महागाई वाढतच जाते. ज्यावेळी उच्च शिक्षणाचा काळ सुरु होतो मग निरनिराळ्या शैक्षणिक क्षेत्रातील फी व इतर खर्चाचे आकडे पाहून पालक हतबल होताना दिसतात. अशावेळी शैक्षणिक कर्जाशी तडजोड हा एकच पर्याय पालकांसमोर असतो व योग्यवेळी योग्य आर्थिक नियोजन न केलेला निर्णय भविष्यासाठी मारक ठरतो. ते खालील उदाहरणवरून लक्षात येईल.

श्री. राजीव हे सध्या ५० वर्षांचे आहेत. त्यांना दोन मुले आहेत. ते निमसरकारी नोकरी करतात व त्यांना बऱ्यापैकी पगारही आहे. ज्यावेळी त्यांना दोन मुले झाली त्यावेळी प्रत्येकाच्या नावावर त्यांनी एक विमा पॉलिसी काढली. दरमहा ५०० रु. चा हप्ता ते नियमितपणे भरत आहेत. आज त्यांचा मुलगा अजय १९ वर्षांचा आहे. मुलगी अस्मिता २२ वर्षांची आहे. ती इंजिनिअरिंगला असून त्यांनी घेतलेल्या पॉलिसीचे पैसेही त्यांना मिळाले. पण खरं तर एकाही वर्षाचा शैक्षणिक खर्च त्यांनी घेतलेल्या पॉलिसीमधून भागवता आला नाही. कारण त्यांनी महागाईचा विचारच कधी केला नाही. जमा केलेली सर्व पुंजी मुलीच्या शिक्षणासाठी संपली व मुलीच्या लग्नासाठी त्यांच्या हातात काहीच शिल्लक राहिले नाही. आता मुलाचा पुढील खर्च कसा उभा करायचा ? याची चिंता त्यांना सतावत आहे. इतका मोठा खर्च होईल याचा त्यांनी कधी अंदाजच बांधलेला नव्हता. साधारणपणे सर्वसामान्य लोकांची हीच परिस्थिती आहे. आयुष्याच्या मध्यावधी काळात न केलेल्या नियोजनाची खंत सतत त्यांना भेडसावत असते. या सर्वांवर तोडगा म्हणून त्यांनी एज्युकेशन लोनचा आधार घेतला.

याउलट श्री. राजाराम यांची परिस्थिती काही वेगळीच दिसते. श्री. राजाराम यांचे वय ५८ वर्षे आहे. मुलांचा जन्म झाल्यावर पॉलिसी घेतली. पण त्या पॉलिसीचे पैसे मिळाले. त्यामध्ये एका वर्षाचाच खर्च. अशातच मुलगा हुशार निघाला म्हणून स्वत:च जामीन राहून एज्युकेशन कर्ज काढून त्याला शिकविले. इंजिनिअर झाल्यावर मुलाला मोठ्या शहरात नोकरी लागली. त्यानंतर बऱ्यापैकी दोन वर्षांचे हप्ते मुलाने व्यवस्थित भरले. दरम्यान मुलाचे लग्न झाले. साहजिकच लग्न जोरात झाले व त्यासाठी खर्चही भरपूर झाला. लग्नासाठी मुलाने पर्सनल लोन काढले होते. एकीकडे त्यांचा संसार सुखाचा चालला होता तर... दुसरीकडे त्याच्या शिक्षणासाठी काढलेल्या कर्जाचे हप्ते भरणे बंद झाले. भविष्यात सेटल होण्यासाठी भावी घराची स्वप्ने पाहिली जाऊ लागली व फ्लॅट खरेदीचा आराखडा तयार होऊ लागला. मात्र श्री. राजाराम यांची चिंता वेगळीच होती. कारण रिटायर झालेल्या राजाराम यांचे उत्पन्नाचे साधन बंद झाले होते व त्यातच एज्युकेशनल लोनच्या परतफेडीसाठी बँकेने त्यांच्या पाठीमागे तगादा लावला होता. रिटायरमेंट कशी घालवावी ? कर्जाची परतफेड कशी करावी ? या पेच प्रसंगात ते हतबल झाले होते. आयुष्यामध्ये योग्यवेळी योग्य नियोजन न केलेले त्यांचे संपूर्ण जीवनच चुकीच्या दिशेने वाटचाल करत आहे. आपल्या जीवनातील दीर्घकालीन आर्थिक गरजांचा पाठ-पुरावा न केलेमुळे त्याची फार मोठी किंमत मोजावी लागते.

## मुलांच्या शिक्षणातील आराखड्यामधील महत्त्वाचे मुद्दे

आपल्या मुलांच्यासाठी भविष्यातील शैक्षणिक क्षेत्राचा आराखडा तयार केला पाहिजे. वाढत्या महागाईनुसार केव्हा किती पैसा लागेल याचा अंदाज घेऊन मुलांच्या शिक्षणासाठी शक्य तितक्या लवकर गुंतवणुकीस प्रारंभ करावा. यासाठी गुंतवणूक साधनांचा अभ्यास करा. अल्पकालीन गुंतवणुकीसाठी सुरक्षिततेचा विचार करा. दीर्घकालीन गुंतवणुकीमध्ये जोखीम स्विकारा. गुंतवणुकीमध्ये सातत्य ठेवा.

खालील आराखडा पहा.

| मुलाचे वय | मनोरंजन खर्च | वैद्यकीय खाणेपिणे व इतर गरजा | शिक्षण | अयोग्य तरतूद | योग्य तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| ० – ५ वर्षे | मोठा खर्च | मध्यम खर्च | अल्प खर्च | अल्पकालीन गरजांकडे खर्चाचा कल | मोठी जोखमीची गुंतवणूक आवश्यक |
| ५–१० वर्षे | अल्प खर्च | मध्यम खर्च | मध्यम खर्च | दीर्घकालीन गरजांकडे दुर्लक्ष | मोठी जोखीम स्वीकारून गुंतवणूक आवश्यक |
| १०–१५ वर्षे | मध्यम खर्च | मध्यम खर्च | मध्यम खर्च | दीर्घकालीन गरजांकडे दुर्लक्ष | मोठ्या गुंतवणुकीस मध्यम प्रारंभ |
| १५–२० वर्षे | मोठा खर्च | मोठा खर्च | मोठा खर्च | तरतूद नसल्याने शैक्षणिक कर्जाचा आधार | मोठा खर्च |
| २०–२५ वर्षे | मोठा खर्च | मोठा खर्च | मोठा खर्च | – | पुरेसा पैसा उपलब्ध |

शैक्षणिक क्षेत्रातील महागाई १० टक्के वाढतेय यावरून ५ वर्षांनंतर किती रक्कम हवी याचा आराखडा पहा.

| कोर्स | कोल्हापूर सांगलीसाठी शैक्षणिक खर्च | कोल्हापूर सांगलीसाठी ५ वर्षांनंतरचा खर्च | पुणे मुंबईसाठी सध्याचा खर्च | पुणे मुंबईसाठी ५ वर्षांनंतरचा खर्च | बेंगलोर व परदेशी शहरांसाठी खर्च | बेंगलोर व परदेशी शहरांसाठी ५ वर्षांनंतरचा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| इंजिनियर | ५ लाख | ९ लाख | ८ ते १० लाख | १८ ते २० लाख | १२ ते १५ लाख | २५ ते ३० लाख |
| डॉक्टर | १५ लाख | २५ लाख | २५ ते ३० लाख | ४० ते ५० लाख | ४० ते ५० लाख | ८० ते ९० लाख |
| एमबीए | ३ लाख | ५ लाख | ५ लाख | १० लाखापर्यंत | १२ लाख | २२ लाख |
| प्रोफेशनल | – | – | – | – | – | – |

गुंतवणूक करताना आपल्या पाल्याच्या उच्च शिक्षणासाठी किती कालावधी आहे व वाढत्या महागाईनुसार किती पैसा लागेल याचा अंदाज घेऊन अल्पकालीन गुंतवणुकीस सुरक्षितता दिली पाहिजे. तसेच ५ वर्षे व त्यावरील गुंतवणुकीस जोखीम देणे गरजेचे आहे. खालील आराखड्यावरून लक्षात येईल की मुलांच्या शिक्षणासाठी कसे नियोजन पाहिजे.

| मुलांचे वय | उच्च शिक्षणाचे वय | गुंतवणूक अवधी | इंजिनिअरिंगचा सध्याचा खर्च | ९% महागाई नुसार अपेक्षित खर्च | ८% परताव्याने दरमहा आवश्यक गुंतवणूक | १२% परताव्याने दरमहा आवश्यक गुंतवणूक |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ वर्षे | १९ वर्षे | १४ वर्षे | ६ लाख | २० लाख | ६७०० | ४९०० |
| १० वर्षे | १९ वर्षे | ९ वर्षे | ६ लाख | १३ लाख | ८३७२ | ७००० |
| १५ वर्षे | १९ वर्षे | ४ वर्षे | ६ लाख | ९ लाख | १५६०० | १४९०० |

खालील गुंतवणूक साधनांची माहिती घ्या.

| साधन | | कालावधी |
|---|---|---|
| विमा पॉलिसी एंडोमेंट | ६ ते ७ % | १० ते १५ वर्षे |
| बँक एफ. डी. | ८ ते ९ % | ५ ते ७ वर्षे |
| पोस्ट आर. डी. | ८ % | ५ ते १० वर्षे |
| म्युच्युअल फंड एस.आय.पी. | ९ ते १० % | ३ ते ५ वर्षे |
| म्युच्युअल फंड बॅलन्स फंड | १० ते १२ % | ५ ते १० वर्षे |
| म्युच्युअल फंड डा. इक्विटी फंड | १२ ते १५ % | ७ ते १५ वर्षे |

वरीलप्रमाणे आपणास दरमहा गुंतवणुकीस साधने उपलब्ध आहेत. एखाद्या फायनान्सियल प्लॅनरकडून आपल्या गरजांचे नियोजन करून घेतल्यास तुमच्याकडे असलेल्या गरजांच्या कालावधीनुसार जोखीम स्वीकारून गुंतवणूक करता येईल व कमी खर्चात मोठी रक्कम योग्य वेळी कशी उभी करावी ? त्याचे ज्ञान अवगत होईल. कारण आर्थिक गरजांचे नियोजन हा यशस्वी जीवनाचा पाया ठरतो. 'पाया भक्कम तर भविष्यातील इमारत मजबूत' अशाप्रकारे योग्य नियोजन केल्यास आपल्या मुलांच्याबराबर आपलेही जीवन यशस्वी होईल.

❖❖❖